जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०८/०१/२०२४
## दि.०७/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे १३/२०२४,भादविक ३२४,५०४,५०६,आर्म ॲक्ट कलम ४(२५) |
| **फिर्यादी** | प्रसाद विधाते,वय २८ वर्षे,रा.उज्वल निवास,आंबेगाव-पठार,पुणे |
| **आरोपीत** | पॅगो रिक्षावरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०१/२०२४ रोजी १८/३० ते १८/४५ वा.चे दरम्यान जेएसपीएम बिल्डींग जवळ,कात्रज बायपास व कात्रज पीएमपी बस स्टॉप जवळ,पुणे-सातारा रोड,कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे भावाचा ट्रक कात्रज बायपास मुख्य रोडवर घेण्यासाठी रोडवर उभे राहुन हातवारे करीत असताना,अचानकपणे विरुध्द दिशेने यातील नमुद इसमाची पॅगो रिक्षा आल्याने फिर्यादी यांनी रिक्षा पॅगोला थांबण्यासाठी हात केल्याचे कारणावरुन,त्यामधुन पॅगो रिक्षावरील चालक खाली येवुन,फिर्यादीस शिवीगाळ व धक्का-बुक्की करुन,तुला माहित आहे का,मी कोण आहे,मी इथला बादशाह आहे,थांब तुला दाखवतो असे फिर्यादीस बोलुन, त्याचे कडील लोखंडी हत्यार काढले. त्यावेळी फिर्यादी हे घाबरुन कात्रज चौकाचे दिशेने पळत कात्रज पीएमटी बस स्टॉप जवळ,पुणे-सातारा रोड येथे आले असताना, सदर इसमाने त्याचे जवळील लोखंडी हत्याराने फिर्यादीचे हातावर,कपाळावर डोळयाचे वरील बाजुस उजव्या बाजुने वार करुन त्यांना जबर दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस फौजदार, कैलास आखुटे ९८२३५१५३४४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ०६/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४८ वर्षे,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०६/०१/२०२४ रोजी २२/३० वा.स्वारगेट एस.टी. स्टॅण्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया स्वारगेट एस.टी.स्टॅण्ड,पुणे येथे स्वारगेट ते तुळजापुर या शिवशाही बस मध्ये प्रवासी म्हणुन चढत असताना,कोणीतरी अज्ञात चोरटयाने,बस मधील गर्दीचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे गळयातील ९०,०००/- रु किचे सोन्याचे मंगळसुत्र चोरी करुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. हनुमंत भोसले ९८८१००२३२४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे १८/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-६० वर्षे,रा.मोहम्मदवाडी,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०६/०१/२०२४ रोजी १७/०० वा.सांगरिया सोसायटी,कडनगर चौकाचे जवळ असलेल्या शॉपिंग सेंटर मधील जॉकी शो-रुमचे समोर सार्वजनिक रोडवर |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे कुटुंबासह सांगरिया सोसायटी कडनगर चौकाचे जवळ असलेल्या शॉपिंग सेंटर मध्ये पिठाची गिरण पाहण्यासाठी गेलो असताना,यातील नमुद इसमाने अचानक फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांचा पाय पकडुन,मी तुमची माफी मागुन का असे फिर्यादीस बोलुन,त्यांचे खिशातील ३०,५००/- रुपये रोख रक्कम चोरी करुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वैभव सोनवणे ८८०५३३७१०० |

## <u>दि.०८/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ०५/२०२४,भादविक ३२४,१४३,१४७,१४८,१४९,५०४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ |
| **फिर्यादी** | किरण ढावरे,वय ३८ वर्षे,रा.घर नं.९६०,पदमावती,पुणे |
| **आरोपीत** | १.एक इसम व त्याचे इतर ०६ साथीदार २.एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०१/२०२४ रोजी रात्रौ २२/०० वा.घर नं.९६०,महात्मा गांधी सोसायटी,पदमावती,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा अल्पवयीन मुलगा यास आ.क्र.१ याने दि.०५/०१/२०२४ रोजी रात्रौ शिवीगाळ केली होती. त्याबाबत फिर्यादी हे त्यांचा मुलगा व त्यांचा पुतण्या भुवण ढावरे,वय २४ वर्षे याचेसह त्यास जाब विचारण्यासाठी गेले असता,इतर इसमांनी त्या गोष्टीचा राग येऊन,त्यांना शिवीगाळ करून,तेथे पडलेले लाकडी बॅट व दांडक्याने डोक्यात मारून,शिवीगाळ व लाकडी बॅट व दांडक्याने मारहाण केली. त्यानंतर सर्वांनी मिळुन फरशीचे तुकडयांनी मारुन जखमी केले. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. कल्पना काळे ९५७९०१९१८८ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ०६/२०२४,भादविक ३२४,१४३,१४७,१४८,१४९,५०४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ |
| **फिर्यादी** | विनोद मोरे,वय ४६ वर्षे,रा.घर नं ९६१,पदमावती,पुणे |
| **आरोपीत** | १.एक इसम व त्याचे इतर ०६ साथीदार २.दोन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०१/२०२४ रोजी रात्रौ २२/०० वा.घर नं.९६०,महात्मा गांधी सोसायटी,पदमावती,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी जेवण करून बसले असताना,त्यांचे शेजारी राहणारा यातील नमुद आ.क्र.१ याने फिर्यादीचे घरासमोर येऊन शिवीगाळ करीत असताना,फिर्यादी यांचा मुलगा विराज विनोद मोरे,वय-२२ वर्षे सदर बाबत त्यांना विचारणा केल्याचे कारणा वरून,त्यांनी तु खाली ये,मी तुला दाखवतो असे म्हणुन विराज व पुतण्या दिशांत मोरे हे खाली आल्यावर आ.क्र.१ व त्याचे इतर साथीदार यांनी त्यांना मारहाण करण्यास सुरवात केली. त्यावेळी फिर्यादी हे नातेवाईकासह भांडणाच्या आवाजाने खाली आले असता,सदर इसमांनी फिर्यादी यांची पत्नी १.विजय मोरे,वय ३८ वर्षे २.गणेश मोरे,वय ५० वर्षे यांचे दिशेने फरशीचे तुकडे फेकुन मारल्याने त्यांना दुखापत झाली आहे. तसेच फिर्यादी यांचे हातावर लाकडी दांडक्याने मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सचिन खेतमाळस ९५९५३८३६२६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**